# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-७४** **दिनांकः- २६ / ०३ / २०२१**

## वृध्देच्या डोक्यात हातोडयाने ६ दुखापती करुन, जबरीने दागिणे चोरणा-या" आंतरराष्ट्रीय आरोपीस २४ तासाच्या आत गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा कडून अटक

**दि**नांक २६/०३/२०२१ रोजी ११.०० वा.चे. सुमारास मिरारोड पुर्व. येथे फिर्यादीचे रहाते घरी ओसवाल आर्चीड सोसायटीमध्ये दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीची आई श्रिमती मजलेननिसा शेरमोहम्मद अन्सारी वय-६७ वर्षे हया एकटयाच घरी असतांना फिर्यादीचे घरी येवुन तुमचा रुम विकत घ्यायचा आहे असे सांगुन त्यातील एक इसम बाहेर थांबुन व एक इसम रुममध्ये येवुन त्यांने श्रिमती मजलेननिसा यांच्या डोक्यात हातोडयाने ६ वार करुन जखमी करुन त्यांचे हातातील दोन सोन्याच्या बांगडया व गळयातील सोन्याची चैन व पॅडल असे १,५०,०००/- रुपये किमतीचा माल जबरीने चोरी करुन पळुन गेल्या बाबत **मिरारोड पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. I १२९/२०२१, भा.द.वि. कलम ३९४,३४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील घटनास्थळवरुन मिळालेल्या तांत्रीक पुराव्याच्या आधारे व स्थानीक साक्षीदारांकडुन मिळालेल्या माहीतीवरुन सदरचा गुन्हा **राशीद शकील खान** रा. पठाणवाडी, मालाड मुंबई याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीताचा मुंबई, मिरा-भाईंदर, ठाणे शहर परिसरात शोध घेता सदर आरोपीत **राशीद शकील खान वय-५० वर्षे, रा. पठाणवाडी, मालाड मुंबई** हा ठाणे येथे मिळुन आल्याने त्यास गुन्हयांचे अनुषंगाने अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीत याचेकडे तपास केला असता त्याने लोकांना सर्बीया येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवुन फसवणुक केल्याची कबुली दिली आहे. आरोपीचे ताब्यातुन मिरारोड पोलीस स्टेशन गुन्हा गु.नों.र.क्र. I १२८/२०२१, भा.द.वि. कलम ३७९ अन्वये दाखल गुन्हयांतील ४०,०००/-रुपये किमतीची होंडा पॅशनप्रो मोटारसायकल नंबर एम.एच.०४/एच.ई./८१८० ही ताब्यात घेण्यात आली आहे. तसेच आरोपीत याने डोंगरी मुंबई येथुन ॲक्टीव्हा मो.स्कुटर चोरी केली असुन त्याबाबत डोंगरी पोलीस ठाण्यात गु.नों.र.क्र. I ७०/२०२१, भा.द.वि. कलम ३७९ अन्वये दाखल आहे. आरोपीत यास दुबई येथील गुन्हयांत शिक्षा लागलेली असुन व मालदिव येथे फसवणुकी केल्याची कबुली देत आहे.

सदरची कामगीरी मा.श्री. डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविराज कुराडे सहा.पो.निरी. विलास कुटे, सहा.पो.निरी. प्रविण स्वामी, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सहा.पो.उप-निरी. राजु तांबे, पो.हवा./३६ संदीप शिंदे, पोहवा/२२१७ किशोर वाडिले, पोहवा/११०९ अविनाश गर्जे, पोना/३०८ पुष्पेंद्र थापा, पोना/१६४४ सचिन सावंत सर्व नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास मिरारोड पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

--oo--